राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२५ परीक्षा दिनांक २६ एप्रिल, २०२६.

**2025**

**D22**

| BOOKLET NO. |
| --- |
| 124795 |

# सामान्य अध्ययन – IV
# General Studies – IV
## Paper – 7 (अनिवार्य/ Mandatory)

**Time Allowed : Three Hours** **Maximum Marks : 250**

**Medium : Marathi / English** **Type of Paper : Conventional / Descriptive**

### प्रश्नपत्रिकेसंबंधी विशेष सूचना

***प्रश्नांची उत्तरे लिहिण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :***

1. दोन भागात (विभाग-अ व विभाग-ब) विभागलेले बारा प्रश्न मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेत छापलेले आहेत.
2. **सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.**
3. प्रत्येक प्रश्नांचे गुण त्याच्या समोर दर्शविण्यात आले आहेत.
4. अर्जामध्ये दिलेल्या पर्यायानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे मराठी किंवा इंग्रजी यापैकी एकाच भाषेत लिहावीत.
5. अर्जात दावा केल्यानुसार/प्रवेशपत्रात दर्शविल्यानुसार उत्तरपुस्तिकेवर उत्तराचे माध्यम नमूद करावे. अधिकृत माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमात लिहिलेले उत्तर तपासले जाणार नाही व त्यांना गुण दिले जाणार नाहीत.
6. जेथे पर्याय दिलेले असतील तेथे सोडविलेल्या पर्यायांचे केवळ आवश्यक संख्येइतकेच अनुक्रमाने प्रथम प्रतिसादांचे मूल्यांकन केले जाईल. एखादे उत्तर काट मारल्याशिवाय अंशत: सोडविलेले असल्यास ते मोजण्यात येईल. अतिरिक्त प्रतिसादांचे मूल्यांकन केले जाणार नाही आणि त्याकडे दुर्लक्ष केले जाईल.
7. उमेदवारांनी प्रश्नाच्या सर्व उपप्रश्नांची एकत्रित उत्तरे सोडविणे अपेक्षित आहे. जर एखाद्या प्रश्नाचा उपप्रश्न इतरत्र सोडविल्यास, (काही पृष्ठ सोडल्यानंतर किंवा दुसऱ्या इतर प्रश्नाचा प्रयत्न केल्यानंतर) अशा प्रकरणी नंतरचे उपप्रश्न मुल्यांकनासाठी दुर्लक्षित केले जाईल.
8. **प्रश्न क्रमांक १(अ) च्या उपप्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० शब्दांमध्ये, प्रश्न क्रमांक १(ब), १(क) व प्रश्न क्रमांक २ ते ६ च्या उपप्रश्नांची उत्तरे १५० शब्दांमध्ये, तर प्रश्न क्रमांक ७ ते १२ ची उत्तरे २५० शब्दांमध्ये असावीत.**
9. प्रश्नात दर्शविलेली शब्द मर्यादा लक्षात घ्यावी.
10. उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पान किंवा पानाचा भाग रिकामा अथवा कोरा ठेवला असेल तर ते स्पष्टपणे रद्द करणे/काट मारणे आवश्यक आहे.
11. कोणत्याही प्रकारच्या संदेहाच्या स्थितीत, इंग्रजी भाषांतर अधिकृत समजले जाईल.

### Question Paper Specific Instructions

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

1. There are Twelve Questions divided in two Sections (Section-A and Section-B) and printed both in Marathi and English.
2. **All Questions are compulsory.**
3. The number of marks carried by a question/part is indicated against it.
4. All questions can be attempted only in one language either in Marathi or in English as per option given in the application form.
5. The medium of answer should be mentioned on the answer book as claimed in the application and printed on admission card. The answers written in medium other than the authorized medium will not be assessed and no marks will assigned to them.
6. Wherever option has been given only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Excess responses shall not be assessed and shall be ignored.
7. Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few page or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.
8. **Answer to sub-questions of Question Number 1(a) should be in 30 words each, Answers to the Question Number 1(b), 1(c) and sub-questions of Question Number 2 to 6 should be in 150 words, whereas answers to Questions Number 7 to 12 should be in 250 words.**
9. Keep in mind the word limit indicated in the question.
10. Any page or portion of the page left blank in the Question cum Answer Booklet must be clearly struck off.
11. English version of the question shall be authentic in case of any type of ambiguity.

**P.T.O.**

## विभाग – अ /SECTION – A

**Q1.** (अ) i) मानवीय कार्यातील नैतिकतेचे सार, निर्धारक व परिणाम स्पष्ट करा. **(2×5=10)**

(a) Explain the essence, determinants and consequences of ethics in human action.

ii) खाजगी व सार्वजनिक संबंधातील नैतिकतेतील फरक स्पष्ट करा.

Differentiate between ethics in private and public relationships.

iii) महान नेत्यांचे जीवन मानवी मूल्ये रूजवण्यासाठी कसे उपयुक्त ठरते ?

How do lives of great leaders help inculcate human values ?

iv) मूल्य रूजविण्यात कुटूंबाची भूमिका स्पष्ट करा.

Explain the role of family in inculcating values.

v) नैतिकता अभ्यासक्रमात केस स्टडी पद्धतीचा वापर का केला जातो ?

Why is the case study approach used in ethics syllabus ?

**Q1.** (ब) मानवी वर्तनाला आकार देणाऱ्या अभिवृत्तीच्या (attitude) तीन मुख्य घटकांचे योग्य उदाहरणांसहीत स्पष्टीकरण द्या. **10**

(b) Explain the three main components of attitude shaping human behaviour, with suitable examples.

**Q1.** (क) एखादया संघटनेतील उच्चस्तरीय प्रशासकांमध्ये आत्मभान/स्व-जाणीवेच्या अभावाचा संघटनेच्या एकूण कामकाजावर काय परिणाम होतो ? **10**

(c) What is the impact of lack of self-awareness among top level administrators in an organisation on the overall functioning of the organisation ?

---

**Q2.** (अ) ई-गव्हर्नन्समध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचा (AI) वाढता वापर कार्यक्षमता वाढवतो, मात्र अल्गोरिदमिक पूर्वग्रह व पारदर्शकतेशी संबंधित नैतिक प्रश्न निर्माण करतो. नैतिक मुदयाची चर्चा करा व दुर्बल घटकासाठी निष्पक्षता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी उपाय सुचवा. **10**

(a) The increasing use of Artificial Intelligence (AI) in e-governance has improved efficiency but has also raised ethical concerns related to algorithmic bias and transparency. Discuss the ethical issues involved and suggest measures to ensure fairness and accountability, especially for vulnerable sections of society.

---

**Q2.** (ब) सोशल मिडीयाच्या युगात द्वेषपूर्ण भाषण व चुकीची माहीती सामाजिक सलोख्यावर परिणाम करू शकतो. लोकशाही समाजात अभिव्यक्ती स्वातंत्र्य व सामाजिक सलोखा यांचा समतोल साधतांना येणाऱ्या नैतिक आव्हानांची चर्चा करा. **10**

(b) In the age of social media, hate speech and misinformation can disturb social harmony. Examine the ethical challenges involved in balancing freedom of speech with the need to maintain social harmony in a democratic society.

---

**Q3.** (अ) नीतिशास्त्र म्हणजे काय ? लोकप्रशासनातील त्याचे महत्व स्पष्ट करा. **10**

(a) What is Ethics ? Explain its significance in Public Administration.

(ब) संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेली 'संरक्षणाची जबाबदारी' ही संकल्पना काय आहे ? या संकल्पनेच्या उदयामागील पार्श्वभूमी स्पष्ट करा. **10**

(b) What is the concept of 'Responsibility to Protect' as endorsed by the UN ? Explain the background of emergence of this concept.

---

**Q4.** (अ) एकात्म मानव दर्शन प्रणीत अंत्योदयाचे (शेवटच्या माणसाची मुक्ती) नीतिशास्त्र सांगा. **10**

(a) Explain the ethics of Antyodaya (Emancipation of last man) which is advocated in Integral Humanism.

**Q4.** (ब) उपयुक्ततावादी नीतिशास्त्राचा न्याय संकल्पनेशी असलेला संबंध चिकीत्सकरीत्या स्पष्ट करा. **10**

(b) Critically explain the relationship between utilitarianism and concept of justice.

---

**Q5.** (अ) प्रशासनाच्या प्रक्रियेत नैतिक मूल्यांना बळकटी देण्यासाठी सर्वसाधारणपणे अवलंबली जाणारी विविध धोरणे स्पष्ट करा. **10**

(a) Explain the various strategies normally adopted for strengthening ethical values in governance.

---

**Q5.** (ब) प्रशासकांना नैतिक मार्गदर्शन देऊ शकतील असे काही भारतीय कायदे स्पष्ट करा. **10**

(b) Explain a few Indian laws which can prove to be the sources of ethical guidance to administrators.

---

**Q6.** (अ) सध्याच्या काळात सार्वजनिक प्रशासनातील सेवा वितरणाचा दर्जा वाढवण्यासाठी कोणते विविध मार्ग आहेत ? **10**

(a) What are the various ways by which the quality of service delivery in public administration can be improved in contemporary times ?

**Q6.** (ब) शासकीय क्षेत्रात माहितीची देवाणघेवाण म्हणजे काय ? तिची उद्दीष्टे आणि महत्व स्पष्ट करा. **10**

(b) What is meant by information sharing in government ? Explain its objectives and importance.

---

## विभाग – ब /SECTION – B

**Q7.** केस स्टडी : **20**

तुमची नियुक्ती महाराष्ट्रातील एका संवेदनशील ग्रामीण तालुक्यात नव्याने अधिकारी म्हणुन झाली आहे. हा भाग पारंपारिक जातिय श्रेणी व्यवस्था व अधुनमधुन उद्‌भवणाऱ्या सामाजिक तणावासाठी ओळखला जातो. राज्य सरकारने अत्यंत वंचित समुदायांसाठी खास गृहनिर्माण व उपजीविका योजना सुरू केली आहे. या योजनेची निष्पक्ष व कार्यक्षम अमंलबजावणी करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे.

मात्र स्थानिक नेते प्रशासनातील कर्मचाऱ्यावर दबाव टाकून अर्जांना विलंब लावणे, संसाधनाचा अपव्यय करणे आणि वंचित समुदायामध्ये चूकीची माहीती पसरविणे अशाप्रकारे योजनेत अडथळे निर्माण करीत आहेत. अशा विशेष योजनामुळे सामाजिक तणाव वाढतो, असे कारण ते पुढे करतात. सार्वजनिक सेवक म्हणुन या परिस्थितीत नैतीकता व मानवी संबंधाशी संबंधित मुद्दयाचे विश्लेषण करा आणि तुम्ही ही परिस्थीती कशी हाताळाल ते स्पष्ट करा.

Case Study :

You are the newly appointed officer in a sensitive rural block of Maharashtra known for rigid traditional cast hierarchies and occasional social tensions. The State Government has launched a new housing and livelihood scheme specifically targeted at the most deprived communities and you are responsible for its efficient and impartial implementation.

However, local leaders are obstructing the process by influencing administrative staff to delay applications, diverting resources and spreading misinformation among the deprived communities. They justify their actions by arguing that such exclusive schemes create social friction.

As a public servant, analyze the ethical and human interface issues involved in this case and explain how you would handle the situation.

---

**Q8.** वैद्यक नीतिशास्त्राच्या आधारे वैद्यकीय पर्यटनाच्या प्रस्तावित योजना (केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ नुसार) कितपत योग्य आहेत याची सविस्तर चर्चा करा. वैद्यक नीतिशास्त्राच्या मूलभूत तत्वांमध्ये सांगीतल्यानुसार वैद्यक पर्यटनाच्या योजनेचे नैतिक मूल्यमापन करा. **20**

Discuss how morally valid the proposed Scheme of Medical Tourism (as per union budget 2026) is ? Do moral evaluation of Medical Tourism Scheme as per fundamental principles of medical ethics.

---

**Q9.** केस स्टडी : **20**

'वैयक्तिक पूर्वग्रहांचे व्यवस्थापन'

एका महानगरात एक वरिष्ठ पोलीस अधिकारी – सहायक पोलीस आयुक्त जातीय तणाव अनुभवत आहे. एका गटाकडून एक निषेधाचे आंदोलन चालवले जाते आहे. त्या गटाची विचारप्रणाली पोलीस अधिकाऱ्याला आक्रमक, आक्षेपार्ह आणि त्याच्या स्वत:च्या श्रद्धेच्या विरुद्ध वाटते आहे. आंदोलना दरम्यान त्या गटाचा एक सदस्य पोलीस अधिकाऱ्याच्या कुटुंबाचा, पोलीस अधिकाऱ्याच्या (सहायक पोलीस आयुक्त) कनिष्ठांसमोर अपमान करतो.

वरील प्रकरण या पोलीस अधिकाऱ्याने कसे हाताळावे ?

Case Study :

'Managing Personal Bias'

A senior police officer, an Assistant Commissioner of Police in a metropolis, is experiencing communal tension. A protest is being led by a group, whose ideology he finds offensive and contrary to his own beliefs. During the protest, a member of this group insults his family, in front of his (Assistant Commissioner of Police) subordinates.

How should this Police Officer handle the above case ?

---

**Q10.** केस स्टडी : **20**

कामाच्या ठिकाणचे वाद सोडवणे

तुम्ही एका खात्याचे प्रमुख आहात. तुमच्या हाताखाली दोन अतिशय हुशार कर्मचारी आहेत, परंतु त्यांचे विचार जुळत नाहीत. त्यांच्यातील संघर्षामुळे संपूर्ण कार्यालय दोन गटात विभागले गेले आहे, आणि त्यामुळे विशिष्ट वेळेत पूर्ण करायचा असलेल्या एक प्रकल्पाचे काम रखडले आहे. दोन्ही कनिष्ठ कर्मचाऱ्या पैकी एक पारंपारिक विचारांचा नियम पाळणारा आहे तर दुसरा तंत्रकुशल आणि नव्या वाटा शोधणारा आहे.

दोन्ही कनिष्ठ कर्मचाऱ्यांची कौशल्ये प्रकल्पासाठी महत्वाची आहेत. एक वरिष्ठ अधिकारी म्हणून तुम्ही हा प्रश्न कसा सोडवणार आहात, दोघांमधील संघर्ष सोडवून दोघांच्या कौशल्यांचा फायदा कसा करून घेणार आहात ?

Case Study :

Conflict resolution at the work place

You are the head of a department. You have two highly talented subordinates who strongly disagree with each other. Their personal rivalry has split the office into two camps, slowing down a time-sensitive project. One deputy is an old-school rule-follower, while the other is a young technosavvy innovator.

The skills of both the subordinates are important for the project. How will you solve this problem as a senior officer and utilize the skills of both by resolving this conflict ?

---

**Q11.** पर्यावरण नीतिशास्त्राचे प्रमुख आयाम सांगा. पद्मश्री चैत्राम पवार यांच्या कार्यात पर्यावरण नीतिशास्त्राचे नियम कसे साध्य होतात याचा नैतिक अहवाल मांडा. **20**

Discuss the main aspects of environmental ethics. Present a moral report of the social work of Padmashree Chaitram Pawar based on environmental ethics.

---

**Q12.** केस स्टडी : **20**

प्रसंग -

आपण एका जिल्हयाचे अधिकारी असून त्या जिल्हयातील एका दुर्गम आदिवासी गावाला मुख्य शहराशी जोडण्यासाठी उच्च गती पुल (High speed bridge) उभारण्याचा एक मोठा पायाभुत प्रकल्प सुरु आहे. यापुलामुळे आदिवासी समुदायाला आरोग्यसेवा व शिक्षणाच्या सुविधा प्रमाणात उपलब्ध होणार आहेत. मात्र या पूलाच्या बांधकामासाठी गावातील एक पवित्र सामुदायिक देवस्थान/श्राइन स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

स्थानिक आदिवासी ज्येष्ठ आणि प्रभावशाली सामाजिक गट या प्रकल्पाला तीव्र विरोध करत आहेत. त्यांना हा प्रकल्प त्यांच्या सांस्कृतीक ओळखीवर झालेला आघात वाटत आहे.

दरम्यान येणाऱ्या निवडणुकीपुर्वी काम पूर्ण करण्यासाठी बांधकाम कंत्राटदारावर तीव्र राजकीय दबाव आहे. कंत्राटदाराने विरोध शांत करण्यासाठी गावच्या प्रमुखाला "खाजगी देणगी" देऊ केल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत.

नैतीक मूल्यांशी तडजोड न करता हा प्रकल्प पूर्ण होईल आणि निर्माण झालेला संघर्ष सुटेल, यासाठी आपण योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे.

जिल्हयाचा अधिकारी म्हणुन आपण ही परिस्थिती कशी हाताळाल ?

Case Study :

The scenario –

You are the officer of a district where a major infrastructure project a high speed bridge is being constructed to connect a remote tribal village to the main city. While the bridge will significantly, improve health care and education access for the tribal community. Its construction requires the relocation of a sacred community shrine. The local tribal elders and influential social groups are vehemently opposing the project, viewing it as an assault on their cultural identity.

Meanwhile, the construction contractor is under intense political pressure to complete the work before an upcoming election. There are complaints that the contractor has offered a "Private donation" to the village headman to silence the opposition. It is must to resolve this conflict while ensuring the project's completion without compromising ethical standards.

How would you handle this situation as an officer of the district ?

AL